सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – intake@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**परिपत्रक / कालमर्यादित:**

क्रमांक: १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/२०२४/३२८ दिनांक : 22 JUL 2024

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची पडताळणी करणेबाबत

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एडीएम/Intake Approval/२०२४/२०९, दि.२२/०५/२०२४

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये या संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांबाबत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, परीक्षा मंडळाची संलग्नता इत्यादी माहिती ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करण्याबाबत कळविले होते. त्याअन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता पदविका अभ्यासक्रम आणि त्यांची प्रवेश क्षमता इ. बाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती संस्थेमार्फत भरण्यात आली होती व सदरील माहिती तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत पडताळून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेच्या अनुषंगाने मंजूर प्रवेश क्षमता व इतर अनुषंगिक माहिती संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने संबंधितांना कळविण्यात येते की, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व पदविका संस्थांची प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेली संपूर्ण माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीशः स्वतः तपासणी/पडताळणी करावी. **सदर माहितीमध्ये काही तफावत / त्रुटी आढळल्यासच त्याबाबतची माहिती फक्त intake@dtemaharashtra.gov.in या ईमेलवरच दि. २४/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावी. ज्या संस्थांच्या माहितीमध्ये तफावत /त्रुटी नसेल अशा संस्थानी E-mail करू नये.** सदर प्रसिध्द केलेल्या माहितीबाबत विहित मुदतीमध्ये नमुद केलेल्या इमेलवर त्रुटीसंदर्भात काहीही कळविण्यात आले नाही, तर संस्थेच्या प्राचार्यांनी सदर माहिती तपासली असून ती बरोबर आहे, असे गृहीत धरुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेश करण्यात येतील व त्याबाबत प्राचार्य व्यक्तीशः जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत - माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना :

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती / छ. संभाजीनगर / मुंबई / नागपूर / नाशिक / पुणे. त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील सर्व संबंधित पदविका संस्था प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

२) कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांनी पडताळणी केलेल्या संस्थांतील मंजूर अभ्यासक्रम, त्यांची मंजूर प्रवेश क्षमता व तदअनुषंगिक अद्ययावत माहिती प्रवेशाच्या पोर्टलवर List of Institutes participated in CAP या Link अंतर्गत सर्व संबंधितांना दिसेल अशा रितीने प्रसिध्द करावी. तसेच सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

३) प्राचार्य / संचालक, इ.दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासकीय, अशासकीय अनुदानित व